# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 17/09/2021 (शुक्रवार)

(सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. मौदा :- अंतर्गत मौदा येथे दिनांक 15/09/2021 चे 08.30 वा. ते दिनांक 16/09/2021 चे 03.45 वा. फिर्यादी नामे- रवीन्द्र गणपतराव सिंगनजुडे, वय 53 वर्ष, रा. मारोडी त. मौदा जि. नागपुर यांचे किराणा दुकानाचे अज्ञात आरोपीने दरवाज्याचे कुलुप तोडून दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानाचे आत ठेवलेली गोदरेज कंपनी ची लहान लोखंडी पेटी त्यामध्ये असलेल नगदी 15,000/-रू. व दोन चांदीचे शिक्के किमती 1,000/- व केरोसीन लायसन असा एकुण कि. 16,000/-रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार देशमुख हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :- अंतर्गत निशा दत्त कॉम्पलेक्स पोदार हॉस्पिटल जवळ कॅमरा येथे दिनांक 15/09 2021 चे 19.00 वा. ते दिनांक 16/09/2021 चे 05.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- नितिन मनोहरराव गेडाम वय 33 वर्ष रा. कळमेश्वर हुडको कॉलनी यांचे दुकान कॉम्पलेक्स निशा दत्त कॉम्पलेक्स पोदार हॉस्पिटल च्या जवळ असून (किराणा व जनरल साहीत्य) अज्ञात आरोपीने दुकानाचे शटर वाकवुन वर करून आत मध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानामधील साहित्य व गल्यातील चिल्लर 3,000/-रूपये व नोटा 3,000/-रूपये असा एकुण किमती 15 ते 20 हजार रूपये चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सावळा मो. नं. 8408806690 या करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :- अंतर्गत आम्बडी केसोरी फाटा येथे दिनांक 26/08/2021 चे 07:45 वा. दरम्यान ईश्वर महादेव गायधनी वय 35 वर्ष, रा. वरंभा हा आपले ताब्यातील मोटरसायकल क्र एम एच- 40/ सीएम- 0047 ने हल्दीराम कंपनी येथुन वरंभा आपले घरी जात होता. त्यादरम्यान मौजा आंबाडी केसोरी फाटयाजवळ त्याने आपली मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याचा तोल जाउन स्वतः मोटरसायकल वरुन खाली पडला व त्याच्या डोक्याला जबर मार लागुन तो जखमी झाला. उपचारादरम्यान आपले मरणास कारणीभुत झाल्याने चौकशी अहवालावरुन सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा रवीन्द्र बकाल पो स्टे मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री सोनेकर मो क्र 8975921770 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर